Email - Info@maharashtracrimetimes.com

# महाराष्ट्र क्राईम टाइम्स

संपादकः- राकेश शंकर गोरे

प्रकाशन - मुंबई, एकाच वेळी प्रसारीत ठाणे, पालघर, पुणे, सातारा, रत्नागिरी

R.N.I. No. MAHMAR/2010/33301

● वर्ष : ९ ● अंकः ११ ● पृष्ठः ४ ● मुंबई, मंगळवार १२ जून २०१८ ते सोमवार १८ जून २०१८

मूल्य २/- रुपये

Website:maharashatracrimetimes.com Email-maharashtracrimetimes33301@gmail.com POSTAL REGISTRATION NO. MCN/157/2017-2019

3 | ठाण्यात पावसाळापूर्व वृक्षछाटणी सदोष ?

शाळेत मोबाईल नेण्यास लवकरच बंदी | 4

# ७२ तासात १६ राज्यांमध्ये मुसळधार पाऊस




**मुंबई (विशाल कारंडे)-** मॉन्सून संपूर्ण देशात वेगाने सक्रीय होत आहे. महाराष्ट्रातून मॉन्सूनने आता छत्तीसगढ, बिहारकडे आगेकूच केली आहे. मात्र, त्यापूर्वीच हवामान विभागाने मुसळधार पावसाची शक्यता वर्तवली आहे. पुढील ७२ तांसात देशातील १६ राज्यांमध्ये वीजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस पडणार असल्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तवलाय. त्यामुळे हवामान खात्याने या राज्यांना सतर्क राहण्याचे आवाहनही नागरिकांना केले आहे. हवामान खात्याच्या मते, दिल्ली-एनसीआर आणि परिसरात आगामी २४ तास फार महत्वाचे असणार आहेत. हरियाणा, चंडीगढ, उत्तर प्रदेश, पूर्व राजस्थानमध्ये वादळीवाऱ्यासह पाऊस होण्याची शक्यता आहे. तर, मध्यप्रदेश छत्तीसगढ, विदर्भ, पश्चिम बंगाल, सिक्किम, ओडीशा, बिहार, झारखंड, उत्तराखंड आणि हिमाचल प्रदेशात वीजांचा कडकडाट, वादळी वारे आणि पाऊस कोसळण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.पुढील ७२ तासांमध्ये दिल्ली-एनसीआरसह चंढीगढ आणि उत्तर प्रदेशमधील काही भागांत वीजांच्या कडकडासह वादळीवारे आणि मुसळधार पाऊस कोसळण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. त्यामुळे हवामान खात्याने समुद्र किनारपट्टीवरील नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहेत. तसेच समुद्रात किंवा नदीत न जाण्याचेही आवाहन केले आहे.



## थोडक्यात महत्वाचे

### ताजमहलचे नाव बदलून 'राम महल' किंवा 'कृष्ण महल' ठेवा

**लखनऊ (नमिता मुणगेकर)-** नेहमीच वादग्रस्त वक्तव्यामुळे चर्चेत राहणारे भाजप आमदार सुरेंद्र सिंह यांनी आणखी एक वक्तव्य करून नव्या वादाला तोंड फोडले आहे. जगप्रसिध्द



ताजमहलचे नाव बदलून 'राम महल' किंवा 'कृष्ण महल' ठेवा, असे विधान त्यांनी केले आहे. सुरेंद्र सिंह हे बैरियामधून भाजपचे आमदार म्हणून निवडून आले आहेत. ताजमहलचे नाव बदलण्याच्या विधानामागील कारण काय आहे, याचे स्पष्टीकरण त्यांनी दिले आहे. सुरेंद्र सिंह म्हणाले, ही वास्तू भारतातील साधनांचा, येथील मातीचा वापर करून उभारण्यात आली आहे. कोणी स्वतःच नाव देत असेल तर ते योग्य नाही. ताजमहलच नाव बदलण्यात यावं का? असा प्रश्न प्रसारामाध्यमांनी विचारला असता सुरेंद्र सिंह म्हणाले, 'ताजमहलचे नाव बदलून राम महल किंवा कृष्ण महल असे देण्यात यावे. या वास्तूचे नाव बदलण्याचे हक्क माझ्या हाती असते तर मी, राष्ट्रभक्त महल असे ठेवले असते.'

### मुख्यमंत्री तुम्हालाही वाण नाही पण गुण लागला : अजित पवार

**पुणे (अभिजीत येरल्लु)-** पंतप्रधान नरेंद्र मोदी सतत परदेशात फिरत असतात आता मुख्यमंत्रीही परदेशात गेले आहेत. त्यामुळे मुख्यमंत्र्यांनाही वाण नाही पण गुण लागला, अशी बोचरी टीका माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली. अजित पवार म्हणाले, की चार वर्षांत सरकारने कसे वाटोळे केले याची आपण



पुस्तिका काआहोत. हजारो कोटी बुडवून अनेकजण परदेशात पळून गेले. सतत संप होत आहेत, याबद्दल आगोदर तोडगा का कानाही. गेल्या दहा दिवसांपासून शेतकरी संपावर आहेत. हे राज्यकर्ते कशासाठी काम करतात याचे आत्मचिंतन करण्याची वेळ आली आहे. देशभरातील वातावरण बदलत आहे. ही पश्चिम महाराष्ट्रातील हल्लाबोलची सांगता सभा असली तरी यापुआंदोलन सुरुच राहणार. एवया समस्या असताना माधुरीला भेटून काय होते? शेवटच्या माणसापरयत पोचले पाहिजे. आपल्याला विदर्भात विजय मिळाला आहे. पश्चिम महाराष्ट्र आपला गआहे, त्यामुळे याठिकाणी आपले वर्चस्व राहिलेच पाहिजे.

### 'ती' आंघोळ करत होती, आजोबा चोरून बघत होते

**मुंबई (विशाल कारंडे)-** बिल्डिंगच्या दुरुस्तीचे काम सुरू असताना एका फ्लॅटमध्ये घुसखोरी करत महिलेला आंघोळ करताना चोरून बघणे एका पासष्ट वर्षीय आजोबांना महागात पडले आहे. दत्ताराम सुर्वे असे या आजोबांचे नाव असून त्यांना अटक करण्यात आली आहे. महिला ज्या बिल्डिंगमध्ये



राहते त्या बिल्डिंगमध्ये सध्या दुरुस्तीचे काम सुरू आहे. यामुळे बिल्डिंगभोवती बांबू बांधण्यात आले आहेत. तर काही ख़िडक्यांचे ग्रील कायात आले आहेत.

अनेक कामगार तिथे काम करत असून आरोपी आजोबा हे देखील त्यांपैकीच एक कामगार आहेत. काम सुरू असताना या आजोबांनी एका घरात प्रवेश केला. त्यावेळी घरातील महिला बाथरूममध्ये आंघोळ करत होती. हे बघून आजोबा तिथेच लपले व महिलेला चोरून पाहू लागले. दरम्यान महिलेचे आजोबांकडे लक्ष गेले व ती हादरली. कशीबशी ती बाहेर धावत आली व तिने घरच्यांना याबदद्ल सांगितले. त्यानंतर आजोबांनी तिथून पळ कात्यानंतर महिलेने सेक्रेटरीकडे याबद्दल तक्रार केली. सेक्रेटरीने पोलिसांना बोलवले त्यानंतर दत्ताराम सुर्वेला अटक करण्यात आली.

## बारमालकाची शक्कल! बारबाला लपवण्यासाठी शौचालयात गुहा; 'दबंग' शिवदीप लांडेंची कारवाई

**मुंबई (सम्यक कासारे)-** मुंबईच्या एका बारमध्ये बारबाला लपवण्यासाठी शौचालयात तयार करण्यात आलेली गुहा डीसीपी शिवदीप लांडे यांनी शोधून काढली. शनिवारी रात्री मुंबईतील डी. बी. मार्ग पोलीस ठाण्याच्या हद्दीतील डायमंड चित्रपटगृहाजवळील कल्पना बारमध्ये पोलिसांनी छापा टाकला. शिवदीप लांडे गस्तीवर असताना, डान्सबारबाबत त्यांना टीप मिळाली. त्यानंतर ही कारवाई करण्यात आली. याप्रकरणी बारमालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सुरू आहे.

या बारमध्ये बारबाला लपवण्यासाठी शौचालयात गुहा तयार करण्यात आली होती. पोलिसांच्या कारवाईपासून वाचण्याकरिता बारबालांना या गुहेत लपवले जाते होते. या कारवाईत १२ बारबाला, बारमधील ९ जणांसह १८ ग्राहकांवर कारवाई करण्यात आली आहे. याशिवाय पोलिसांनी येथून ८४ हजार रुपयांची रोकड देखील जप्त केली आहे. अशाचप्रकारची कारवाई २६ मे रोजी दहिसरच्या शार्मिली बारमध्येही करण्यात आली होती. येथेही एक छुपं कपाट बनवलं होतं त्यामध्ये ११ बारबालांना लपवण्यात आलं होतं. त्यावेळी ५० जणांना पोलिसांनी ताब्यात घेतलं होतं.



४० वर्षीय शिवदीप लांडे २००६ च्या बॅचचे आयपीएस अधिकारी आहेत. मी नियमांचं पालन करतो. वरीष्ठांनी दिलेली कोणतीही जबाबदारी पार पाडणं हे माझं काम आहे, आणि ही छापेमारीही त्याचाच परिणाम आहे, अशी प्रतिक्रिया लांडे यांनी दिली. लांडे यांच्या दबंग कारवाईनंतर बिहारचा सिंघम अशी ओळख मिळवलेल्या IPS शिवदीप लांडे यांनी महाराष्ट्रातही धडक कारवाई सुरु केल्याची चर्चा आहे.

## गाईच्या संवर्धनासाठी दारुवर लागणार 'काऊ सेस'

**मुंबई (अमोल गुडेकर)-** गोशाळांना केंद्र सरकारकडुन मिळणार अनुदान बंद झाल्यानंतर याच नुकसान भरून काढण्यासाठी सरकारने नवी शक्कल लढविली आहे. लवकरच राज्यामध्ये दारूवर 'काऊ सेस' लागणार आहे. राजस्थान सरकारने हा निर्णय घेतलाय. कॅबिनेटमध्ये परिपत्रकाच्या माध्यमातून या अध्यादेशाला मंजूरी देण्यात आली आहे. गार्यींसाठी स्वतंत्र मंत्रालय असलेलं राजस्थान हे देशातील पहिलं राज्य आहे.



दारूवर सेस आणणाऱ्या वसुंधरा राजे यांच्या भाजपा सरकारने गेल्यावर्षी गाय कर वसूल करण्यासाठी स्टॅम्प ड्युटीवर १० टक्के काऊ सरचार्ज वसूल करण्याची घोषणा केली होती. 'गो वंश' संरक्षणासाठी काऊ सरचार्जचा निर्णय घेतल्याचे सरकारचे म्हणणे होते. राज्यातील गोशाळेत ५ लाखाहून अधिक गाई असून त्यांच्या संरक्षणासाठी कमीतकमी २०० ते ५०० कोटी रुपयांची गरज असल्याचे सरकारचे म्हणणे आहे.

### दीरासोबत पळाली ३ बाळांची आई, गावकऱ्यांनी मुंडन करुन फिरवलं गावभर

**रांची (प्रकाश पवार)-** झारखंडमधील चतरा पोलीस ठाणे क्षेत्रात रविवारी गावकऱ्यांनी एका प्रेमी युगूलाचे मुंडन करून त्यांना गावभर फिरविले. या प्रेमी युगुलांच वहिनी आणि दीर असं नात आहे. याप्रकरणी पिडितेने गावातील ७ जणांविरूद्ध प्राथमिक तक्रार केली आहे. पोलिसांनी यामध्ये हस्तक्षेप करून आरोपींना पकडण्यास सुरूवात केली आहे. एका तरुणाचं आपल्या भावाच्या बायकोसोबत प्रेमप्रकरणं सुरू होतं. साधारण ६ महिने यांच नात सुरू होतं. दोघांनी लग्न करण्याचा निर्णय घेतला. वहिनी पतीला सोडून दीरासोबत पळून गेली. ही बातमी गावामध्ये वाऱ्यासारखी पसरली. सगळीकडे दोघांची शोधाशोध सुरू झाली. गावकऱ्यांचा राग अनावर होत गेला. लग्नाच्या काही महिन्यांनंतर शनिवारी हे दोघे पुन्हा परतले.ते दोघे गावात येताच गावकऱ्यांनी पंचायत बोलावली.

## 'पेट्रोल-डिझेलला जीएसटी अंतर्गत आणा'

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)-** देशभरात पेट्रोल आणि डिझेलच्या वाढत्या किंमतीवरून माजी केंद्रीय अर्थमंत्री आणि ज्येष्ठ काँग्रेस नेते पी. चिदंबरम यांनी भाजप सरकारवर जोरदार टीका केली आहे. 'पेट्रोल आणि डिझेलला जीएसटीच्या अंतर्गत आणून इंधनाचे दर का कमी करत नाही?,' असा सवाल चिदंबरम यांनी भाजप सरकारला केला आहे.



पी. चिदंबरम यांनी एक पत्रक काढून इंधनाबाबतच्या सरकारच्या धोरणावर जोरदार टीका केली आहे. कृषी, जीडीपी, रोजगार निर्मिती, उद्योग आणि अर्थव्यवस्था आदी मुद्द्यांवरून चिदंबरम यांनी भाजपला घेरले आहे. पेट्रोल आणि डिझेलची दर वाढ आणि घरगुती गॅसच्या किंमती वाढल्याने लोकांमध्ये प्रचंड असंतोष खदखदत असल्याकडेही त्यांनी सरकारचं लक्ष वेधलं.

'इंधनाला जीएसटी अंतर्गत आणलं तर त्यामुळे पेट्रोल-डिझेलचे दर कमी होतील. केंद्रात भाजपचं सरकार आहे आणि बहुतेक राज्यात भाजपचीच सरकारे आहेत. अशावेळी इंधन दरवाढीचं खापर राज्यांवर का फोडल जातंय? तुमच्याकडे बहुमत आहे. त्यामुळे तुम्ही इंधनाला जीएसटी अंतर्गत आणायलाच हवे,' अशी जोरदार मागणीही चिदंबरम यांनी केली.

## माधुरीने नाकारली सरकारची ऑफर

**मुंबई (सम्यक कासारे)-** भारतीय जनता पक्षाच्या 'संपर्क फॉर समर्थन' मोहिमेंतर्गत पक्षाध्यक्ष अमित शहा यांनी सेटिब्रिटींच्या भेटी घेण्याचा धडाका लावला आहे. यातच त्यांनी अभिनेत्री माधुरी दीक्षितची भेट घेतली. परंतु, या भेटीनंतर चर्चा रंगली ती माधुरीच्या राजकारणातील प्रवेशाची. परंतु, या चर्चेला माधुरीने या चर्चांना पूर्णविराम दिला आहे. एका हिंदी वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखती दरम्यान माधुरीने राजकीय पदर्पणाचा केला खुलासा, मी एक कलाकार असून माझा राजकारणाशी संबंध नाही. मला राजकारणात रसही नाही. त्यामुळे राजकारण प्रवेशाचा प्रश्नच येत नाही आणि मी राजकारणात येण्याचा कधी प्रयत्नही करणार नाही. सरकारने पाठिंब्यासाठी पुढाकार घेऊन भेटीचा कार्यक्रम आखला आहे.



## तुरुंगातील ५६ शेतकऱ्यांना मिळाली कर्जमाफी

**मुंबई (हर्षद परब)-** शेतकरी कर्जमाफीचा बोजवारा उडालेला असताना कारावासाची शिक्षा भोगत असणाऱ्या शेतकरी कैद्यांना कर्जमाफी मिळाली आहे. राज्यातल्या वेगवेगळ्या कारावासात असणाऱ्या ५६ कैद्यांना कर्जमाफीचा लाभ मिळाला आहे. कपाळावर गुन्हेगाराचा शिक्का बसल्यानंतर त्यांच्यामागे कुटुंबाची अगदी वाताहात होते. त्याच्या कुटुंबाला आर्थिक समस्येचा सामना करावा लागतो. समाजातील पत घसरल्याने नवीन कर्ज मिळत नाही. नव्याने आयुष्य उभे करण्याची संधी मिळत नाही, अशा कोंडी झालेल्या शेतकरी कैद्यांना यानिमित्ताने पुन्हा एकदा चांगले आयुष्य जगण्याची संधी मिळाली आहे. नागपूर आणि नाशिकच्या कारागृहात शेतकरी कैद्यांचे प्रमाण अधिक आहे. अशा शेतकरी कैद्यांपर्यंत कर्जमाफीचा लाभ पोचवण्यासाठी तुरुंग महासंचालनालयाने प्रयत्न सुरू केले आहेत. नागपूरमधील ६६, तर नाशिकमधील २२ शेतकरी कैद्यांतर्फे काम करणाऱ्या सामाजिक संस्थांनी ऑनलाइन अर्ज भरले होते. त्यापैकी ५६ शेतकरी कैद्यांना कर्जमाफी मिळाली आहे.



## सौजन्य व्हॉट्सअप




# राष्ट्रवादीने निवडणूक प्रचाराचे रणशिंग फुंकले

**पुणे (अभिजीत येरल्लु)-** राज्य आणि राष्ट्रीय पातळीवरील नेत्यांची उपस्थिती.. उत्साही कार्यकर्त्यांनी दिलेल्या घोषणा.. जामिनावर सुटल्यानंतर प्रथमच भाषणासाठी उभे राहिलेल्या छगन भुजबळ यांना मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद.. केंद्र आणि राज्य सरकारच्या कारभारावर टीकास्त्र उगारणारी नेत्यांची भाषणे.. पश्चिम महाराष्ट्रातील हल्लाबोल आंदोलनाचा समारोप करताना राष्ट्रवादी काँग्रेसने निवडणूक प्रचाराचे रणशिंग फुंकले. या मेळाव्याच्या निमित्ताने झालेल्या वाहतूक कोंडीमुळे रविवारची सुट्टी असल्याने घराबाहेर पडलेले नागरिक हैराण झाले.

राष्ट्रवादीच्या १९ व्या वर्धापनदिनाचे औचित्य साधून हल्लाबोल आंदोलनाच्या समारोप मेळाव्यामध्ये पक्षाचे अध्यक्ष शरद पवार, ज्येष्ठ नेते प्रफुल्ल पटेल, राष्ट्रीय सरचिटणीस सुनील तटकरे, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, माजी उपमुख्यमंत्री अजित पवार, विधानसभेचे माजी अध्यक्ष दिलीप वळसे-पाटील, विधान परिषद विरोधी पक्षनेते धनंजय मुंडे, खासदार विजयसिंह मोहिते-पाटील, सुप्रिया सुळे, धनंजय महाडिक, मधुकर कुकडे, माजी मंत्री हसन मुश्रीफ, मधुकर पिचड, फौजिया खान, माजी खासदार, निवेदिता माने, चित्रा वाघ यांच्यासह शहराध्यक्षा खासदार वंदना चव्हाण, पिंपरी-चिंचवडचे शहराध्यक्ष संजोग वाघेरे, जिल्हाध्यक्ष जालिंदर कामठे व्यासपीठावर होते. मात्र, माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ हेच या मेळाव्याचे आकर्षण केंद्र ठरले. या मेळाव्याच्या निमित्ताने राष्ट्रवादीने जोरदार शक्तिप्रदर्शन केले. हल्लाबोल आंदोलनाच्या फ्लेक्समुळे वातावरण निर्मिती केली होती. ना. सी. फडके चौकापासूनच फलक कार्यकर्त्यांसह नागरिकांचे लक्ष वेधून घेत होते. दुपारपासूनच शहराच्या विविध भागांतून गाड्या भरून माणसांना शिंदे हायस्कूल या ठिकाणी आणण्यात आले. शिंदे हायस्कूलच्या प्रवेशद्वारापाशी वर्धापनदिनाचा पेढा आणि पाण्याची बाटली देऊन कार्यकर्त्यांना मैदानावर सोडले गेले. स्थानिक नगरसेवक सुभाष जगताप आणि अश्विनी कदम यांनी



मेळाव्याची जय्यत तयारी केली होती. केंद्र आणि राज्य सरकारवर टीका करणारे फ्लेक्स लावण्यात आले होते. त्यातील एका फ्लेक्सवर भाजपचे ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे यांचे छायाचित्र लावण्यात आले होते. पाऊस येण्याची चिन्हे दिसू लागल्याने शरद पवार यांनी भाषण संपविले आणि मेळाव्याची सांगता झाली. त्यानंतर सर्वाची तेथून बाहेर पडण्यासाठी एकच लगबग सुरू झाली. या साऱ्या गोंधळामुळे सहकारनगर परिसरात वाहतुकीची कोंडी झाली.

# संपादकीय..

संपादक:- राकेश शंकर गोरे

## भाजप समोर घटक पक्षांच्या अडचणी

गेल्या दोन आठवड्यांपासून भाजप नेते वेगवेगळ्या लोकांना भेटून पक्षाचा आणि मोदी सरकारच्या चार वर्षांतील कामगिरीचा आलेख मांडत आहेत. पक्षातील सगळ्या नेत्यांना किमान पंचवीस लोकांना भेटण्याचा आदेश आहे. त्याबरहुकूम त्याचे पालनही केले जात आहे. स्वत: पक्षाध्यक्ष अमित शहा दररोज एकेका राज्यात जाऊन मान्यवरांच्या भेटीगाठी घेताना दिसतात; पण या मोहिमेतून नेमके काय साधणार आहे हे स्पष्ट झालेले नाही. अमित शहांनी रामदेव बाबांची भेट घेऊन भाजपच्या जनसमर्थनात फरक पडणार आहे का? रामदेव बाबांची जवळीक कोणत्या पक्षाशी आहे हे आधीच लोकांना माहिती आहे. इतर नेतेही आपल्याच वर्तुळातील वा माहीतगारांच्याच भेटी घेताना दिसतात. जे आपल्या विचारांचे नाहीत, त्यांचे मनपरिवर्तन करून त्यांना भाजपमध्ये आणण्यासाठी 'समर्थनासाठी संपर्क' मोहीम चालवली गेली असती तर त्यातून काही तरी साध्य तरी झाले असते;



पण हा निव्वळ प्रसारमाध्यमांना फोटो पुरवण्याचाच खेळ होऊन बसला आहे. एका भाजप नेत्याने अगदी सहजपणे सांगितले की, एका दिवसात २५ व्यक्तींना भेटून घेतो. एका दिवसातच २५ जणांशी संपर्क होणार असेल तर भाजपचे नेते या मोहिमेबाबत किती गंभीर आहेत हे दिसतेच! भाजप नेतृत्वाने या मोहिमेचा वापर 'एनडीए'तील घटक पक्षांच्या भेटीगाठीसाठी केला. त्यातून ही मोहीम आणखी आकुंचित पावली आहे.

घटक पक्षांच्या नेतृत्वाला जाऊन भेटणे ही मोहिमेंतर्गतची मोहीम होती. आतापर्यंत भाजपने 'एनडीए'तील घटक पक्षांना जमेस धरलेले नव्हते; पण त्यांच्या दारी जायची वेळ आलीच असेल तर एखादा मुखवटा असल्यास ही भेट अधिक सुकर होते. म्हणूनच बहुधा 'समर्थनासाठी संपर्क' मोहिमेद्वारे शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, शिरोमणी अकाली दलाचे नेते प्रकाश सिंग बादल यांची भेट घेतली गेली आणि बंद दरवाजाआड चर्चाही केली गेली. २०१४ मध्ये भाजपला पूर्ण बहुमत मिळवता आले होते. घटक पक्षांच्या टेकूविना केंद्रात सत्ता टिकवण्याचा विश्वास होता, आता मात्र त्याला तडा गेलेला आहे. २०१९ मध्ये घटक पक्षांशिवाय केंद्रात सत्ता बनवता येणार नाही असे संकेत भाजपला कर्नाटकातील पराभवानंतर मिळालेले आहेत. त्यात कैराना लोकसभा पोटनिवडणुकीतील पराभवाने भाजपला वास्तवाची जाणीव करून दिली आहे. हा पराभव भाजपला हादरा देऊन गेला आहे. विरोधकांच्या एकीला प्रत्युत्तर द्यायचे असेल तर घटक पक्ष टिकवले पाहिजेत आणि नवे मित्र जोडले पाहिजेत हे भाजपने ओळखले आहे. खरे तर घटक पक्षांपुढे नमते घेण्याची नामुष्कीही भाजपने पत्करली आहे.

अकाली दल हा भाजपला फारसा त्रास न देणारा एकमेव घटक पक्ष आहे. लंगरची सेवा जीएसटीमुक्त करा, अशी मागणी कित्येक महिने अकाली दल करत होते. त्याकडे भाजपने लक्ष दिले नाही. आता मात्र शहांच्या पंजाबभेटीनंतर लंगर सेवा जीएसटीतून वगळण्यात आली आहे. गेल्या काही महिन्यांत शिवसेनेने भाजपला सातत्याने फटकारले आहे. शिवसेनेचा अहं हे त्यामागचे खरे कारण असले तरी त्या 'अहं'ला चुचकारावेसे भाजपला वाटत नव्हते. महाराष्ट्रात 'एकला चलो रे'चा नारा भाजपने दिला गेला होता; पण आता स्वत:च्या जिवावर महाराष्ट्रात भाजपची सत्ता येण्याची सुतराम शक्यता नाही. भाजपशी जुळवून घेण्याशिवाय शिवसेनेला पर्याय नाही हे खरे; पण तीच अवस्था भाजपचीही झाली आहे. त्यामुळेच अमित शहांना मातोश्रीवर नाइलाजाने का होईना जावेच लागले. मुख्यमंत्र्यांना मातोश्रीवर असतानाही त्यांच्याविना उद्धव ठाकरेंशी 'हितगुज' करावे लागले. केंद्रातील मंत्रिमंडळ विस्तारात शिवसेनेला कॅबिनेट मंत्रिपद दिले जाऊ शकते; पण दोन तासांच्या चर्चेनंतरही शिवसेनेने विधानसभेसाठी १५२ जागांची मागणी करून भाजपच्या अडचणीत भरच टाकली आहे.

भाजपसाठी सर्वात डोकेदुखी ठरू लागले आहेत ते बिहारमधील घटक पक्ष. नितीशकुमार यांचा जनता दल (संयुक्त), रामविलास पासवान यांचा लोकजनशक्ती पक्ष आणि उपेंद्र कुशवाह यांचा राष्ट्रीय लोकसमता पक्ष असे प्रमुख तीन घटक पक्ष एनडीएमध्ये आहेत. त्यापैकी पासवान आणि कुशवाह केंद्रात मंत्री आहेत. कैरानातील पराभवानंतर बिहारमधील घटक पक्षांनी उचल खाल्ली आहे. या पक्षांची मागणी एकच आहे की, भाजपने घटक पक्षांना बरोबरीचा दर्जा दिला पाहिजे. कुशवाह यांनी आतापासूनच लोकसभेच्या जागावाटपाची चर्चा करण्याचा आग्रह धरलेला आहे. नितीशकुमार यांना बिहारमध्ये आपल्याच नेतृत्वाखाली लोकसभा निवडणुका लढवायच्या आहेत. बिहारमध्ये भाजपने धाकटा भाऊ बनूनच राहिले पाहिजे, असा थेट संदेश नितीशकुमार यांनी दिला आहे. त्यामुळे बिहारमध्ये भाजप आणि घटक पक्षांतील संबंध कमालीचे ताणले गेले आहेत. चार दिवसांपूर्वी बिहारमधील घटक पक्षांची बैठक समन्वयाविनाच संपली. कुशवाह तर बैठकीत सहभागीही झाले नाहीत. या बैठकीनंतर बिहारमध्ये पक्षापक्षांमधील तणाव आणखी वाढला आहे.

भाजपकडे ईशान्येकडील राज्यांमधील छोटे घटक पक्ष आहेत. २०१९ मध्ये सत्तास्थापनेसाठी एकेका जागेसाठी लढावे लागले तर छोटे घटक पक्षही महत्त्वाचे ठरणार आहेत. जम्मू-काश्मीरमध्ये पीडीपी-भाजप संबंध दोन्ही पक्षांसाठी तारेवरची कसरत झालेली आहे. काश्मीर प्रश्न हाताळणे भाजपच्या हाताबाहेर गेल्याचे सातत्याने दिसू लागले आहे. पीडीपीचा भर संवादावर आहे, तर भाजपचा पॅलेट गनवर. त्यामुळे श्रीनगरच्या रस्त्यावर तरुणांची दगडफेक कायमच आहे. तमिळनाडूमध्ये अण्णा द्रमुकच्या साथीने भाजपला शिरकाव करावा लागणार आहे; पण नव्या भिडूंनी ही लढाई आणखी तीव्र केली आहे.

## वाढता 'मार्क्स'वाद..

सध्या सर्वत्र विकासाची एवढी घोडदौड सुरू आहे, की कुठे थांबावयाचे ते त्या विकासालाही कळेनासेच झाले असावे. आपण एखादी शर्यत सुरू करतो, तेव्हा ती शर्यत जेथे संपणार त्या रेषेवर स्पर्धकाला थांबावयाचे असते. पण सध्या अशी काही स्थिती आहे की, स्पर्धा संपण्याच्या रेषेपलीकडे पोहोचल्यावरही स्पर्धा संपतच नाही. बिहार हे राज्य अनेक बाबतींत अन्य अनेक राज्यांच्या किती तरी पुढे आहे व काही बाबतीत तर कोणतेच राज्य त्या राज्याशी कधीच बरोबरीदेखील करू शकणार नाही, अशी स्थिती काही वर्षांपूर्वीपर्यंत या राज्यात होती.



आपल्या या प्रगतीचा चढता आलेख खुद्द त्या राज्यास असह्य होऊ लागल्याने, अनेक बाबतींमध्ये या राज्याने त्या क्षेत्रांतील आपल्या 'प्रगती'चा वेग कमी केला. त्यामुळे, महाराष्ट्रासह अनेक राज्यांची काही 'नामचीन' बाबींसंबंधात अलीकडे बिहारशी तुलना करणे शक्य होऊ लागले. कोणे एके काळी महाराष्ट्रात खून, दरोडे, मारामाऱ्या, बलात्कार किंवा कोणतीही अमानवी प्रवृत्तीची गुन्हेगारी घटना घडली की, 'बिहारलादेखील मागे टाकेल अशी लाजिरवाणी घटना' असे तिचे वर्णन केले जात असे. बिहारने या बाबतीत स्वत:ला काहीसा लगाम लावून घेण्याचे ठरविल्याने, महाराष्ट्रातील अशा घटना बिहारला लाजविणाऱ्या म्हणून गणल्या जाण्याच्या प्रकारास लगाम बसला . गेल्या काही दिवसांपासून शिक्षणक्षेत्रातील बौद्धिक घोडदौडीची चर्चा महाराष्ट्रात सुरू असताना आणि राज्यातील विद्यार्थ्यांच्या बुद्ध्यांकाच्या सरासरीने शंभरीची टक्केवारी गाठल्याची अभिमानास्पद चर्चा सर्वत्र सुरू झालेली असताना, अशा स्पर्धेत महाराष्ट्रावर कुरघोडी करण्याचे स्वप्न पाहताना बिहारसारख्या नेहमीच सर्व बाबतींत आघाडीवर असण्याची सवय असलेल्या राज्याच्या शिक्षणक्षेत्रात महाराष्ट्रावर मात करण्याची ईर्ष्या उत्पन्न न होती, तरच नवल! महाराष्ट्राच्या शालान्त परीक्षांमध्ये एकीकडे 'मार्क्सवाद' बोकाळू लागल्याने, मुलांच्या एवढ्या भरघोस मार्कांचे काय करावयाचे या चिंतेने पालकवर्ग ग्रासलेला असताना, बिहारने महाराष्ट्रावर केलेल्या कुरघोडीमुळे महाराष्ट्राच्या शिक्षणक्षेत्रातील पालकवर्ग नामक हतबल गटास काहीसा दिलासा मिळाला आहे. शंभरीस स्पर्श करणारी गुणव्यवस्था स्थिरावलेली असताना, तिकडे बिहारने तर त्यावरही कडी करून टाकली आहे. बिहारी गुणवत्ता यादीतील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक ज्ञान कसे अगाध असते, त्याचे दाखले देणाऱ्या काही 'पुरावेदार' चित्रफिती गेल्या वर्षीच समाजमाध्यमांवरून प्रसृत झाल्याने अगोदरच बिहारी शिक्षणक्षेत्राची मान खाली गेली होती. ती वर काढून यंदा खरोखरीचे गुणवान विद्यार्थी शिक्षणाच्या कारखान्यातून उत्पादित करण्याचा चंग बांधूनही परत कुठे तरी माशी शिंकलीच. अनेक विद्यार्थ्यांनी शालान्त परीक्षेत शंभर टक्क्यांहून किती तरी अधिक गुण संपादन करून आपल्या बौद्धिक क्षमतेची असामान्य चमक दाखविली आणि काही विद्यार्थ्यांनी तर परीक्षा न देतादेखील उत्तीर्णांच्या यादीत स्थान पटकावले.

## शब्दकोडे क्रमांक-११



**आडवे शब्द**

१. गाण्याची, गप्पांची बैठक ३. खाटीक ५. सगळा हवाला रामावर! ६अ. ज्वर ८. सिंह ९. बगीचा १०. गवताची बारीक काडी ११. पाताळ १३. सन्मान, मान ---- १५. वार्ताहार १७. फळांचे पेय १९. निरुपाय झालेला २१. उत्सवाचे दिवस २३. बंदी, मज्जाव २४. शरीर, काया, तनु २५. छोटी लढाई २८. ध्वनी ३०. मागणेकरी ३१. टक्कर ३३. तमाशा ३५. निराश ३७. सहाय्य ३८. मर्कट ३९. सामोपचार, वेदांपैकी एक ४०. खोडसाळपणे त्रास देणे ४१. मिठीत ४३. कशा प्रकारचा? ४६. हिंदीतील कुंडी मराठी नाट्यपदात- 'प्रभु अजि ---, मनी तोषला' ४८. एकटा, पाश नसलेला ४९. पळ काढणे ५१. पर्वत ५२. हिंदी-इंग्रजी मिळून मराठीत कटाप! ५३. निष्णांत, पारंगत ५६. पोत्याचे कापड ५८. फूल, पुष्प ५९. जुगाराचा एक प्रकार ६०. न कर्त्याचा वार ६२. तपश्चर्या ६४. तारुण्य ६५. दागदागिने ६६. त्वचेवर उन्हाने चढणारा थर ६७. स्वप्न (हिंदी) ६८. सदन, निवासस्थान ७०. कापडाचे धागे आडवे विरत जाणे ७२. व्यवस्था, एकूण काम ७५. आळशी, मठ्ठ ७६. एकदम ७७. वाईट गोष्टीला प्रोत्साहन ७८. केस ७९. चांदणी

**उभे शब्द**

१. शहरांपासून लुप्त होत चाललेली सपाट, विस्तीर्ण जमीन २. पटकन, चटकन ३. युक्ती ४. शोभणारा ५. संताप ६. आवेगात ६अ. साठ मिनिटे ७. क्षणभर ९. च्या बद्दल १०. चरण्याची जागा १२. जिव्हा १४. मरेपर्यंत १५. मूल १६. सेवक १८. चंदन जोडल्यास एक भाजी २०. मूठ भरून २२. व्रताच्या उद्यापनाची सामग्री २३. जलविद्युतनिर्मितीबरोबर भूकंपाशी जोडलेले नाव २६. मधुमक्षिका २७. तीव्र चवीचा (चहा) २८. आजपर्यंत २९. एकत्र येणे, गोळा होणे ३२. टाळ्यांचा आवाज ३४. येरझारा, जाणे-येणे ३६. ढीग ४१. भांडण, खोडी ४२. पाचने गुणल्यास ४४. स्वच्छ ४५. बोलण्यातील अनावश्यक भाग ४७. अंत:करण ४८. सरसकट ५०. मऊ ५४. चारही बाजूस पाणी असलेली जमीन ५५. प्रवेशकार घेण्याची जागा ५७. हिंदीतील स्वयंपाकघर ५८. झाडाला लोंबकळण्याचा एक खेळ ६०. बाण ६१. डावा ६३. वजनदार 'गजगामिनी'ची चाल ६९. बाळसेदार, फुगीर गालांचा ७१. सहापट ७३. छिद्र झाकणारे बारीक शिवणकाम ७४. भ्रम ७४अ. छप्पर

## थोडक्यात महत्वाचे

### धोकादायक इमारतींसाठी 24 तास नियंत्रण कक्ष

**मुंबई (अमोल गुडेकर)-** जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींमधील रहिवाशांच्या सुरक्षेकरीता म्हाडाने २४ तास नियंत्रण कक्ष सुरू केला आहे. मुंबईत म्हाडाच्या अखत्यारीत १४,२८६ उपकरप्राप्त इमारती आहेत. इमारतीच्या धोक्याची लक्षणे किंवा इमारत कोसळल्याचे म्हाडाच्या निदर्शनास आणून देण्याकरता आणि म्हाडातर्फे त्यावर आवश्यक ती कारवाई करण्याकरता ताडदेवमधील इमारत क्रमांक ८९-९५ रजनीमहलमध्ये म्हाडाकडून २४ तास चालणारा नियंत्रण कक्ष सुरू करण्यात आला आहे.



या नियंत्रण कक्षात उपअभियंता व कनिष्ठ अभियंता दर्जाचे अधिकारी २४ तास हजर असणार आहेत. धोक्याची कोणतीही सूचना मिळाल्यास हे अधिकारी प्रत्यक्ष जागेवर जाऊन इमारतीची पाहणी करून आवश्यक ती कारवाई करतील. तसेच महानगरपालिका नियंत्रण कक्षातर्फे प्राप्त झालेली माहिती त्वरीत म्हाडाच्या संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना देऊन पुढील आवश्यक ती कारवाई ही करतील.

### शहरात पाणी तुंबले नव्हते, तर साठले!

**मुंबई (हर्षद परब)-** शहरात पाणी तुंबले नव्हते तर साठले होते, असा दावा महापौर विश्वनाथ महाडेश्वर यांनी केला. झालेल्या पावसात शहरातील काही भागात काही वेळ पाणी साठले होते. पाणी तुंबले होते, असे म्हणता येणार नाही, असे महापौरांनी सांगितले. त्याच वेळी कोणाचेही नाव न घेता महापौरांनी भाजपला टोला लगावला. शिवसेना कोणतीही जबाबदारी झटकत नाही. 'मन की बात' बोलणारे आज 'धन की बात' बोलू लागले आहेत. शिवसेना अच्छे दिनचे दिवास्वप्न रंगवत नाही तर वास्तव चित्र समोर ठेवून काम करते. देशात विषमता, जातीयता, बेरोजगारी असे अनेक प्रश्न आहेत. हे सोडवण्याची जबाबदारी ज्यांच्यावर आहे त्यांनी ती पार पाडून देशातील नागरिकांना चांगले दिवस दाखवावेत. पालिकेला तीचे काम करू द्यावे, असे महापौर महाडेश्वर यांनी सांगितले.



### मुलं पळवून नेणाऱ्या टोळीच्या अफवांनी नांदेड जिल्ह्यात दहशत

**नांदेड (प्रतिनिधी)-** मुलं पळवून नेणाऱ्या टोळ्या सक्रिय झाल्याच्या अफवांचं पेव सध्या फुटलं आहे. या अफवांमुळे निरअपराध लोकांना नाहक मनस्ताप सहन करावा लागतोय. बुधवारी अशीच एक घटना नांदेड शहरात घडली. मुलं पळवून नेणाऱ्या टोळीतला समजून सुमारे शंभर ते सव्वाशेच्या जमावानं एका इसमाला बेदम मारहाण केली.

यावेळी विमानतळ पोलीस घटनास्थळी दाखल झाल्यानं पुढचा अनर्थ टळला. विशेष म्हणजे या अफवांमुळे भंगार वेचणारे, कचारा गोळा करणारे अशा लोकांना जमावाकडून बेदम मारहाण होत असल्याच्या घटना शहरात घडत आहेत. दरम्यान नांदेड जिल्ह्यात किंवा शहरात मुलं पळवणारी अशी कोणतीही टोळी नसून, नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये असं आवाहन, पोलिसांनी केलं आहे.



## टाईमपास

'का रडतेस?'
'तुम्ही दिलेले वचन मोडलंत!'
'हात्तेच्या एवढंच ना! त्यात रडण्यासारखं काय? मी दुसरं देईन हवं तर!'

◆◆◆

'तसे म्हटले तर आपली मुलगी लहानच आहे लग्नासाठी! थोडी वाट पाहिली तर एखादा हुशार नि चुणचुणीत तरुण मिळेल तिला.' 'इश्श! आता कशाला वाट पहाता? लहान आहे तंवरच तिचे लग्न करून टाकायचं. तसं म्हटलं तर मी थोडीच वाट पाहिली.'

◆◆◆

'आमच्या ह्यांना समुद्रातून वाचविणारे तुम्हीच का?'
'हो बाईसाहेब!'
'तर मग त्यांची टोपी कुठं आहे!

◆◆◆

एका घरासमोर सामानाची हालवा हालव चालू होती व बोर्ड लावलेला होता.. नाही! आमची जागा खाली करण्याचा उद्देश नाही! दिवाळीच्या रंगरंगोटीसाठी सामान बाहेर काढले आहे. गैरसमज दूर व्हावा !

## सुडोकू क्रमांक-११

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 6 | 1 | 3 | | | | | | |
| | 4 | | | | 6 | 5 | | |
| | | 8 | | | | | 6 | 4 |
| 2 | 6 | | 3 | 1 | 8 | 9 | | |
| | 5 | 4 | 2 | | 9 | 6 | 3 | |
| | | 9 | 6 | 4 | 5 | | 7 | 8 |
| 9 | 2 | | | | | 4 | | |
| | | 6 | 5 | | | | 2 | |
| | | | | | | 8 | 5 | 9 |




**सुविचार** प्रत्येकाच्या मनात एक आदर्श व्यक्ती असलीच पाहिजे.

## साप्ताहिक राशिभविष्य

**मेष-** आज आपण विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी होऊ शकाल. काहींची आध्यात्मिक प्रगती होईल.

**वृषभ-** मित्रांचे अनपेक्षित सहकार्य लाभल्याने भारावून जाल. अनेकांशी सुसंवाद साधू शकाल. महत्त्वाच्या गाठीभेटी पडतील.

**मिथुन-** उत्साहाने व आनंदाने दिवसभर कार्यरत राहाल. तुमचा आत्मविश्वास, जिद्द वाढवणाऱ्या काही घटना घडतील.

**कर्क-** महत्त्वाच्या आर्थिक कामांना विशेष प्राधान्य देऊ शकाल. आर्थिक बाबतीतील सर्व व्यवहार आज पूर्ण करू शकाल.

**सिंह-** मनस्वास्थ्य बिघडणार आहे. मनातील राग द्वेष व्यक्त करू शकत नसल्याने मानसिक कुचंबणा होईल.

**कन्या-** तुम्हाला तुमच्या कार्यक्षेत्रात सुसंधी लाभणार आहे. प्रवासाचे योग येतील. इतरांना मार्गदर्शन करू शकाल.

**तूळ-** मानसिक बळ वाढेल. थोडाफार उत्साह जाणवेल. वैवाहिक सौख्य लाभेल. जोडीदाराचे सहकार्य मिळेल.

**वृश्चिक-** आजचा दिवस आपणाला भाग्यकारक जाणार आहे. कलाक्षेत्रातील, तुमच्या कार्यक्षेत्रात तुम्हाला सुसंधी लाभेल.

**धनु-** कला व बौद्धिक क्षेत्रातील व्यक्तींना आजचा दिवस विशेष अनुकूल ठरणार आहे. विद्यार्थ्यांची अभ्यासात प्रगती होईल.

**मकर-** मानसिक प्रसन्नता लाभेल. तुमच्या व्यक्तिमत्त्वाचा, मतांचा, विचारांचा इतरांवर प्रभाव पडणार आहे.

**कुंभ-** जिद्द, चिकाटी व मनोबलाच्या जोरावर अनेक कामे पूर्णत्वास न्याल. इतरांना मार्गदर्शन करू शकाल.

**मीन-** मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता आहे. मानसिक कुचंबणा होण्याची शक्यता आहे. काहींना आध्यात्माची ओढ लागेल.

हे मराठी साप्ताहिक **मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक राकेश गोरे** यांनी सोमानी प्रिंटींग, प्रेस गाला नं. ३-४, अमिन इंडस्ट्रीयल इस्टेट, सोनावाला क्रॉस रोड नं. २,जवाहर नगर फाटक ब्रिज जवळ, गोरेगांव (पूर्व), मुंबई- ४०० ०६३. येथे छापून विष्णू सदन सोसायटी रामचंद्र सुखई सोसायटी नं. १, रूम नं. ४, जयहिंद नगर, खार (पूर्व), मुंबई- ४०० ०५१. येथे प्रकाशित केले. R.N.I. NO. MAHMAR/2010/33301. Mob. 9892631863, 9892632268, 022-69998811, website:maharashatracrimetimes.com, **Email-Info@maharashtracrimetimes.com** maharashtracrimetimes33301@gmail.com, **कायदेशीर सल्लागार-** एडवोकेट, हाईकोर्ट मुंबई, डी. के. पांडे (बी.ए.एल.एल.बी.) हा अंक प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख ह्यामधील मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही (मुंबई न्याय कक्षेत)

# शेतकरी संपाचा परिणाम ओसरला: बाजारात शेतीमालाची आवक नियमित

**नवी मुंबई (राकेश गायकवाड)-** शेतकरी संपाच्या दहाव्या दिवशी घाऊक बाजारात रविवारी फळभाज्यांची नियमित आवक झाली. शेतकरी संपाचा फारसा परिणाम जाणवला नाही. टोमॅटो, हिरवी मिरची, घेवडा, मटार, ढोबळी मिरची या फळभाज्यांच्या दरात वाढ झाली. काकडीचे दर उतरले आहेत. गुलटेकडीतील श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्डात रविवारी राज्य तसेच परराज्यातून १४० ते १५० ट्रक फळभाज्यांची आवक झाली. हिमाचल प्रदेशातून २ ट्रक मटार, कर्नाटक आणि आंध्रप्रदेशातून ५ ते ६ ट्रक कोबी, कर्नाटक, तामिळनाड, आंध्र प्रदेश, ओरिसा आणि गुजरातमधून मिळून १० ते १२ टेम्पो हिरवी मिरची, कर्नाटक आणि आंध्र प्रदेशातून मिळून ५ ते ६ ट्रक कोबी, आंध्र प्रदेश आणि तामिळनाडूतून मिळून ३ ते ४ टेम्पो शेवगा, राजस्थान येथून ५ ते ६ टेम्पो गाजर, कर्नाटकातून तोतापुरी कैरी ५ ते ६ टेम्पो, मध्य प्रदेश आणि गुजरातमधून मिळून लसूण चार ते साडेचार हजार गोणी अशी आवक बाजारात झाली, अशी माहिती घाऊक बाजारातील प्रमुख विक्रेते विलास भुजबळ यांनी दिली. पुणे विभागातून सातारी आले १३०० ते १४०० पोती, टोमॅटो तीन ते साडेतीन हजार पेटी, फ्लॉवर १४ ते १५ टेम्पो, कोबी १४ ते १५ टेम्पो, गाजर ४ ते ५ टेम्पो, कांदा ८० ट्रक, आग्रा, इंदूर आणि तळेगाव येथून मिळून नवीन बटाटा ६० ट्रक अशी आवक बाजारात झाली.



## संभाजी भिडे यांच्या 'आंब्या'वर सुप्रिया सुळे यांची टीका

**पुणे (अभिजीत येरल्लु)-** श्री शिवप्रतिष्ठान संघटनेचे संस्थापक मनोहर उर्फ संभाजी भिडे यांनी माझ्या शेतातला आंबा खाल्ला तर अपत्यप्राप्ती होते असे वक्तव्य केले आहे. आता सोशल मीडियावरही या वक्तव्यावर टीका होऊ लागली आहे. तर या वक्तव्याचा राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे यांनीही चांगलाच समाचार घेतला आहे. तंत्रज्ञानाचा विकास होताना एकीकडे आपल्याला दिसतो आहे आणि संभाजी भिडेंसारखी माणसे दुसरीकडे आंबा खाल्ला तर अपत्यप्राप्ती होते असे म्हणतात. त्यांचे हे वक्तव्य दुर्दैवी असून हा महिलांचा अपमान असल्याची टीका सुप्रिया सुळे यांनी केली आहे. प्रत्येक स्त्रीला माता होणे याचा अभिमान असतो. तो मलाही आहे, पण महिला वर्गाचा संभाजी भिडेंनी आपल्या वक्तव्यामुळे अपमानच केला असल्याचे त्यांनी म्हटले आहे. जे सरकार देशात आणि राज्यात आहे त्यांना आणि त्यांच्या जवळच्या लोकांना विज्ञानावरच विश्वास नाही. डार्विनचा सिद्धांत खोटा आहे असे देशाचे शिक्षण मंत्रीच म्हणत आहेत.



# पवारांचं एक वक्तव्य, शिवसेनेत तीन मतं, सेनेसोबतच्या आघाडीबाबत काँग्रेस म्हणतं..

**मुंबई (विशाल कारंडे)-** राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी दिलेल्या अप्रत्यक्ष प्रस्तावानंतर आता शिवसेनेत संभ्रमावस्था झाली आहे. शिवसेना आणि काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडी एकत्र आल्यास भाजपचा पाडाव करणं शक्य आहे, असं पवारांनी कालच्या राष्ट्रवादीच्या कार्यक्रमात म्हटलं होतं. मात्र आघाडी सोबत जाण्याबाबत शिवसेनेतल्या एका गटात कुजबुज सुरु आहे, तर हिंदुत्वाच्या मुद्यावरुन भाजपची साथ न सोडण्यावर दुसरा गट ठाम आहे. याशिवाय स्वबळावर लढून शिवसेनेची ताकद आजमवण्याबाबत पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंवर काही नेत्यांचा दबाव आहे. म्हणजेच पवारांच्या कालच्या वक्तव्यानंतर शिवसेनेत तीन मतप्रवाह तयार झाले आहेत. त्यामुळे आता उद्धव ठाकरे पक्षातील नेत्यांपासून विभाग प्रमुखांपर्यंत चर्चा करून, सामान्य शिवसैनिकांच्या मनात काय आहे, याची चाचपणी करणार असल्याचं सांगण्यात येत आहे.



दरम्यान, शरद पवारांच्या शिवसेना आणि आघाडीबाबतच्या वक्तव्यानंतर काँग्रेसने सावध भूमिका घेतली. 'शिवसेनेसोबतच्या आघाडीसाठी काँग्रेसचा कोणताही प्रस्ताव नाही. शिवसेना आणि काँग्रेसमध्ये वैचारिक मतभेद आहेत.शिवसेनेचा अजेंडा वेगळा आहे. धर्मनिरपेक्ष पक्षांना एकत्र आणलं पाहिजे. त्यामुळे त्याबाबत राष्ट्रीय पातळीवर चर्चा होईल. शरद पवार यांनी व्यक्त केलेले मत वैयक्तिक मत असेल. याबाबत सर्व प्रमुख एकत्र बसतील तेव्हा चर्चा होईल', असं काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष अशोक चव्हाण यांनी सांगितलं.

## मद्यपींच्या खिशावर अतिरीक्त 'लोड'; या राज्यात दारूवर 'काऊ सेस'लागणार?

**जयपूर (हिंदुस्थान समाचार)-** राजस्थान सरकार दारुवर 'काऊ सेस' लावण्याचा विचार करत आहे. या सेसमधून मिळणाऱ्या महसुलाचा वापर गायींच्या सुरक्षेसाठी करण्यात येणार आहे. राज्य सरकारच्या या निर्णयामुळे दारु महाग होणार असून मद्यपींच्या खिशाला 'काऊ सेस'चा अतिरीक्त 'लोड' सोसावा लागणार आहे. 'गोसंवर्धन आणि संरक्षण यासाठी स्टॅम्प ड्युटीवरील अधिभार दुप्पट करण्याचा विचार सुरू असतानाच आता 'काऊ सेस' लावण्याचाही विचार राज्य सरकार करत आहे. यासंदर्भात तयार करण्यात आलेला प्रस्ताव मुख्यमंत्री वसुंधरा राजे यांच्याकडे पाठवण्यात आला आहे. मुख्यमंत्र्यांसोबत एक बैठक होणार आहे. या बैठकीत दारुवर किती अधिभार लावायचा याचा निर्णय घेण्यात येणार आहे.



राजस्थानात या वर्षाच्या अखेरीस विधानसभेची निवडणूक होणार आहे. या पार्श्वभूमीवर स्टॅम्प ड्युटी आणि दारुवर 'सेस' लावण्याचा निर्णय सरकारसाठी तोट्याचा ठरू शकतो. असे असले तरी काही लोक या निर्णयाकडे सकारात्मक दृष्टीने पाहत आहेत. आता वसुंधरा राजे या निर्णयावर शिक्कामोर्तब करणार का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# राज्यात कर्जमाफी योजनेचा फज्जा: राजू शेट्टी यांचा आरोप

**नाशिक (सुनील आव्हाड)- राज्यातील कर्जबादारी शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी राज्य सरकारने मोठा गाजावाजा करीत जाहीर केलेली छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना पुरती फसली आहे. सरकार दरबारी अनेक शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळालेली असली तरी प्रत्यक्षात मात्र कर्ज थकबाकी नसल्याचा दाखला बँका शेतकऱ्यांना देत नाहीत. त्यामुळे पुन्हा कर्ज काढण्यास शेतकऱ्यांना अनेक अडचणी येत असून नाईलाजास्तव शेतकरी पुन्हा एकदा सावकाराच्या दारात उभा राहत आहे.**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मात्र कर्जमाफीपासून वंचित राहिलेल्या शेवटच्या शेतकऱ्याचा शोध घेण्यातच व्यस्त असल्याचा आरोप स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते खासदार राजू शेट्टी यांनी गुरूवारी येथे केला. राज्य



सरकारने मोठा गाजावाजा करीत शेतकऱ्यांसाठी सुमारे ३४ हजार कोटींची कर्जमाफीची घोषणा केली. मात्र वर्षभरानंतरही शेजकऱ्यांना कर्जमुक्ती देण्यात सरकारला यश आलेले नाही. राज्यातील ५६ लाख ५९ हजार शेतककरी कर्जमाफी योजनेस पात्र ठरले असून त्यातील ४९ लाख शेतकऱ्यांना १५ हजार कोटींचा कर्जमाफीचा लाभ झाला असून आता केवळ सात लाख शेतकरीच शिल्लक असल्याचा दावा राज्य सरकार करीत आहेत. प्रत्यक्षात मात्र सरकारची कर्जमाफीची योजना फसल्यामुळे शेतकरी पुन्हा एकदा कर्जबाजारी होत असून त्यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढत असल्याचा आरोप राजू शेट्टी यांनी पत्रकार परिषदेत केला. शेकऱ्यांना कर्जमाफी देतांना सरकारने दुष्काळ कराच्या माध्यमातून सुमारे २२-२३ हजार कोटी रूपये लोकाकडू गोळा केले. मात्र त्याचा लाभही शेतकऱ्यांना दिला नाही. शेतकऱ्यांचा सातबारा कोरा झाल्याचा दावा सरकार करीत असले तरी प्रत्यक्षात मात्र कर्जमाफीच्या यादीत नाव असूनही बँका मात्र शेतकऱ्यांना कर्जाची थकबाकी नसल्याचा दाखलाच देत नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांना पुन्हा कर्ज मिळेनात. गेल्या वर्षभरात पीक कर्जात २० हजार कोटींची घट झाली आहे.

याचा अर्थ राज्यातील शेतकरी सक्षम झाला असा नसून त्यांना कर्जच मिळत नसल्याने ना इलाजास्तव त्याला सावकाराकडून कर्ज घ्यावे लागत आहे. मात्र कर्जमाफीचा लाभ घेणाऱ्या शेवच्या शेतकऱ्याच शोध घेण्यात सरकार मग्न असल्याची बोचरी टीकाही शेट्टी यांनी यावेळी केली. शेती हंगाम सुरू झाला असून शेतकऱ्यांना अडचण नको म्हणून देशात सुरू असलेल्या संपात आम्ही सहभागी झालेलो नाही. मात्र शेतकऱ्याना न्याय मिळावा यासाठी आम्ही दोन अशासकीय विधेयक तयार केली असून त्यासाठी ससंदेचे विशेष अधिवेशन बोलविण्याची मागणी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे करण्यात आली आहे.

## शाळेत मोबाईल नेण्यास लवकरच बंदी



**पॅरीस (पीटीआय)- फ्रान्समध्ये लवकरच शाळांमध्ये मोबाईल न्यायला बंदी घालण्यात येणार आहे. त्यासाठी फ्रान्स सरकार लवकरच एक विधेयक आणणार आहे. मोबाईलमुळे वर्गात येणारे अडथळे आणि खोड्या थांबवण्यासाठी हा निर्णय घेण्यात आलाय. डिटॉक्स मेजर असं याला नाव देण्यात आलंय. फ्रान्समध्ये सप्टेंबरमध्ये शालेय वर्षाला सुरुवात होते. यंदाच्या वर्षापासून ही मोबाईल बंदी लागू होणार आहे. फ्रान्समध्ये शाळेत जाणाऱ्या १२ वर्षांच्या पुढच्या नव्वद टक्के मुलांकडे मोबाईल असतो.**

**फ्रान्सचे शिक्षण मंत्री जीन मिशेल ब्लॅनकर यांनी सांगितले की, ही योजना सप्टेंबर २०१८ मध्ये आमलात आणण्याचा विचार आहे. पुढील शालेय वर्षाच्या सुरुवातीपासून लागू होईल. सहाव्या वर्षांपासून ते १५ वयोगटातील मुलांसाठी सर्व शाळांना हा नियम लागू होईल.**

## आधार कार्डमधील नवीन बदलांची माहिती ऑनलाईन मिळणार



**मुंबई (प्रतिनिधी)-** युनिक आयडेन्टिफिकेशन ॲथॉरिटी ऑफ इंडियाने (यूआयडीएआय) एक नवीन सेवा सुरू केली आहे. यानुसार यूजरला आधार कार्डमधील नवीन बदलांची माहिती ऑनलाईन मिळणार आहे. यूआयडीएआयचे सीईओ अजय भूषण पांडे यांनी सांगितले की,'ही एक नवीन आणि उपयोगी सेवा आहे. ज्याच्या मदतीने लाक आपल्या आधार कार्डमधील बदलांची अथवा अपडेटची हिस्ट्री यूआयडीएआयच्या वेबसाईटवरून मिळवू शकतील. याचा बीटा व्हर्जन सुरू करण्यात आलं आहे.'आधारकार्ड धारकांना यासाठी यूआयडीएआय वेबसाईटवर'अपडेट हिस्ट्री'चा वापर करावा लागणार आहे. आधारच्या वेबसाईटवर यासाठी वेगळं सेक्शन असणार आहे. तेथे तुम्हाला आधार कार्डवरील नंबर आणि कॅप्चा भरावा लागेल.

# मला शिवसेनेची ऑफर होती –नारायण राणे

**मुंबई (विशाल कारंडे)- शिवसेना मी सोडली नव्हती; तर मला सोडायला लावली. बाळासाहेबांच्या मनात माझ्याविषयी गैरसमज निर्माण केले गेले. माझ्यामुळे कुटुंबात वाद नको म्हणून मी शिवसेना सोडली; मात्र काँग्रेस सोडल्यानंतर मला शिवसेनेने ऑफर दिली होती, असा गौप्यस्फोट महाराष्ट्र स्वाभिमान पक्षाचे अध्यक्ष व खासदार नारायण राणे यांनी केला.**



वांद्रे येथील रंगशारदा सभागृहात झालेल्या मेळाव्यात राणे बोलत होते. या वेळी महाराष्ट्र स्वाभिमान पक्षाचे मुंबई अध्यक्ष म्हणून राजेश हाटले यांच्या नावाची घोषणा करण्यात आली. राणे या वेळी म्हणाले, की कॉंग्रेसमध्ये १२ वर्षे राहिलो. या कालावधीत मला तीन वेळा सोनिया गांधी यांच्याकडे बोलावण्यात आले. मुख्यमंत्री करतो, असे सांगितले. अहमद पटेल यांनीही सहा महिन्यांत मुख्यमंत्री करतो, असे आश्वासन दिले होते. एकदा तर मी मुख्यमंत्री झालो म्हणून सगळ्यांनी अभिनंदनही केले होते. मला जास्त आमदारांची पसंती होती; तरी अशोक चव्हाण यांना मुख्यमंत्री केले. सत्ता घालवणाऱ्यांना मुख्यमंत्री केले. मग मी कॉंग्रेसमध्ये का राहावे? काही जण म्हणतात, राणे साहेब उतावीळ होऊन पक्ष का सोडतात? यावर चर्चा होतात; पण मी कुठल्याही प्रकारची घाई करीत नाही. जे माझ्यावर लिहितात, ते माझ्यापेक्षा कनिष्ठ असावेत. आज शिवसेनेत किंवा राज्याच्या एकूण राजकारणात माझ्याएवढी पदे कोणालाही मिळाली नाहीत, असेही राणे या वेळी म्हणाले. शिवसेनेचे मंत्री म्हणतात आम्ही युती तोडतो; पण कधी हे सांगत नाहीत. सगळी जबाबदारी भाजपच घेणार; मग शिवसेनेची काय फक्त खायची जबाबदारी आहे का, असा सवालही राणेंनी या वेळी केला.

# पित्यानेच केला मुलीवर सहा महिने बलात्कार

**जयपूर (वृत्तसंस्था)-** बलात्काराच्या घटना सातत्याने समोर येत असतानाच नात्याला काळिमा फासणारी एक धक्कादायक घटना समोर आली आहे. राजस्थानमधील झालवाड जिल्ह्यात राहणाऱ्या एका ४३ वर्षीय पित्यावर त्याच्या १३ वर्षांच्या मुलीसोबत सहा महिने बलात्कार केल्याचा आरोप लावण्यात आला आहे. पोलिसांनी या नराधम पित्याला अटक केली असून त्याला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. पोलिसांनी आरोपीला ४ जून रोजी राजस्थानच्या मनहोरेथाना परिसरातून अटक केली होती. पोलिसांनी दाखल केलेल्या



तक्रारीनुसार, आरोपी पिता घरातच सहा महिन्यांपासून पोटच्या मुलीवर बलात्कार करत होता. मजदूरी करून पोट भरणारा हा आरोपी आपल्या पत्नीपासून वेगळा राहत असून त्याला तीन मुले आहेत. सहा महिन्यांआधी तो त्याच्या पत्नीकडे परतला आणि मुलांना सांभाळण्याचे आश्वासन देऊन तो आपल्या १३ वर्षांची मुलगी आणि लहान मुलाला आपल्यासोबत घेऊन आला होता.

ही घटना उघडकीस तेव्हा आली, जेव्हा आरोपीची पत्नी आपल्या मुलांना भेटण्यासाठी घरी आली. त्यावेळी पीडितेने आपल्या पित्याचे कृत्य आपल्या आईला सांगितले.

# भ्रष्टाचारप्रकरणी योगी आदित्यनाथ आक्रमक

**लखनौ- उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी भ्रष्टाचाराच्या तक्रारीवरून गोंडा आणि फतेहपूरच्या जिल्हाधिका-यांसह अनेक अधिका-यांविरोधात कडक कारवाई केली आहे. फतेहपूरचे जिल्हाधिकारी कुमार प्रशांत आणि गोंडाचे जिल्हाधिकारी जितेंद्र बहादूर सिंह यांना तत्काळ निलंबित केले आहे. फतेहपूरमध्ये अंजनेयकुमार सिंह आणि गोंडामध्ये प्रभांशु श्रीवास्तव यांची जिल्हाधिकारीपदी नेमणूक करण्यात आली आहे.**

एका अधिका-याने दिलेल्या माहितीनुसार, कुमार प्रशांत आणि जितेंद्र बहादूर सिंह यांच्याविरोधात कामात अनियमितता, अवैध खाण समवेत अनेक प्रकरणांत भ्रष्टाचाराच्या तक्रारी गेल्या काही दिवसांपासून येत होत्या. शासनस्तरावर चौकशी करून ही कारवाई करण्यात आली आहे.

याप्रकरणी या अधिका-यांच्या वरिष्ठांकडे तक्रार करण्यात आली होती. पण त्यावर काहीच कारवाई करण्यात आली नव्हती. जेव्हा याची माहिती योगी आदित्यनाथ यांना समजली. त्यांनी हे प्रकरण गंभीरतेने घेत त्यांना निलंबित केले. त्याचबरोबर गोंडाचे जिल्हा खाद्य विपणन अधिकारी अजयविक्रम सिंह यांना तत्काळ निलंबित करून याप्रकरणी एफआयआर दाखल करण्याचे निर्देश दिले आहेत.



याबाबत आदित्यनाथ म्हणाले की, बहुतांशवेळा छोट्या अधिका-यांना दंडित केले जाते. पण वरिष्ठ स्तरावर याची जबाबदारी निश्चित केली जात नाही. जर वरिष्ठ स्तरावर प्रभावीरित्या सुनावणी आणि कारवाई केली गेली असती तर असा प्रकार घडला नसता. यापुढे आता वरिष्ठ स्तरावर जबाबदारी निश्चित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

# 'महिला समुपदेशन केंद्र सुरुच ठेवा' महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांच्या जिल्हा परिषदांना सूचना

**मुंबई (योगेश होळंब)-** महिलांच्या न्याय हक्कासाठी महाराष्ट्र राज्य महिला आयोग कार्यरत आहे. यामध्ये जिल्हा पातळीवरील महिला समुपदेशन केंद्र ही आयोगाचा कणा म्हणून काम करत आहेत. त्यामुळे जिल्हा पातळीवरील समुपदेशन केंद्र सुरु राहण्यासाठी जिल्हा परिषदांनी पुढाकार घेतला पाहिजे. त्यासाठी निधीची कमतरता पडू देऊ नका, अशी सूचना महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी केली. महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्यावतीने राज्यातील विविध जिल्ह्यातील उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला आणि बाल कल्याण विभाग), जिल्हा महिला बाल विकास अधिकारी, जिल्हा समन्वयक यांची बैठक आज राज्य महिला आयोग कार्यालयात आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. जिल्हा स्तरावर असणारी समुपदेशन केंद्र, स्थानिक महिला तक्रार निवारण समिती, 'जेंडर बजेट'चा विनियोग, जिल्हा समन्वयकांच्या समस्या आदी विषयांवर यावेळी चर्चा करण्यात आली. सदर बैठकीस राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर, सदस्या गयाताई कराड, विंदा कीर्तिकर, आशा लांडगे, प्रभारी सदस्य सचिव डॉ मंजुषा मोळवणे उपस्थित होते. यावेळी बोलताना विजय रहाटकर म्हणाल्या, कि, महिलांना न्याय देण्यासाठी, मार्गदर्शन करण्यासाठी जिल्हा स्तरावर असलेली समुपदेशन केंद्र महत्वपुर्ण योगदान देत असतात. महिलांना आपल्या जिल्ह्यात न्याय मिळावा या दृष्टीने ही केंद्र सुरु राहणे गरजेचे आहे. निधीची चणचण असल्यास आयोग त्याकरिता शासनाकडे पाठपुरावा करेल. मात्र 'सेस फंडा'तून निधी देत जिल्हा परिषदांनी केंद्र सुरु ठेवावीत. तसेच स्थानिक महिला तक्रार निवारण समितीने जलद कार्यवाही करून महिलांना न्याय मिळवून द्यावा.सध्या राज्यात सुमारे तीनशे समुपदेशन केंद्र आहेत. ती प्रामुख्याने ग्रामीण भागात आहेत. त्यामार्फत अडचणीतील संकटग्रस्त महिलांना कायदेशीर सल्ला व मार्गदर्शन दिले जाते. मात्र काही जिल्हा परिषदांनी निधीचे कारण पुढे करून समुपदेशन केंद्र बंद केल्याच्या तक्रारी आयोगाकडे आल्या आहेत. त्याची दखल घेत आयोगाने ही बैठक बोलावली होती.





MEDIA 9 Advertising
For Advertise on
TV9 IBN लोकमत NEWS18 लोकमत साम TV
Birthday / Anversery Wishes ,
Commercial Advt / Corporate Advt
Contact Today - 8655556626
We Also Develop Website and Mobile Apps